International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्य व आक्रमकतेचा अभ्यास

**डॉ. बालाजी दगाजी राऊत**
*संशोधक*
*balaji.raut86@gmail.com*
*Corresponding Author - डॉ. बालाजी दगाजी राऊत*
**DOI - 10.5281/zenodo.10940907**

**प्रस्तावना**:

सध्याच्या समाजाची रचना गुंतागुंतीची आहे. त्यामुळे अगोदर पासूनच अस्तित्वात असलेल्या समस्यांनी उग्ररूप धारण केलेले आहे. तसेच काही नवीन समस्या उपस्तीत झालेल्या आहे. महत्वाचे वाटने स्वाभाविक आहे. शारिरीक स्वास्थासाठी योग्य आहार-विहार वेळोवेळी उपाय म्हणून औषध उपचार अशा प्रकारचे प्रयत्न व्यक्ती करीत असतो. मानसिक आरोग्य म्हणजे व्यक्तीच्या आज समाजामध्ये अनेक समस्यांना जीवनात सामना करावा लागतो. सर्व समस्यांमध्ये जीवन जगतांना मणूष्याला आपले स्वास्थ मानसीक परिपक्वता होय.मानसिक परिपक्वता हे व्यक्तिमत्वाचे सातत्यपूर्ण व टिकावू स्वरूपाचे एक कार्य आहे.

आधुनिक काळात तरूण पिढिचा कल हिंसाचाराकडे वाढलेला दिसतो.भारतात अहिंसा तत्व मानणाऱ्या देशात आज अनेक ठिकाणी सामाजिक आणि कौटूंबीक हिंसा बघायला मिळते .वेगवेगळ्या राज्यात हिंसक वातावरण आहे. त्यात अनेक ठिकाणी सामाजिक, जातिय हिंसा वाढलेली आहे. ईलेट्रानिक माध्यमे यांचा मानवी मनावर परिणाम जानवतो.लहान मुले.तसेच मोठे मुले यांना हानामारी पाहाण्यात खुप मजा वाटते.चित्रपट यात हिंसाचार पाहतात व त्यातून अप्रत्यक्षरित्या आक्रमक बनतात. अनुकरण हिंसक कृत्य पाहून आपोआपच मनुष्य आक्रमक बनतो.

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. व आजकाल प्रत्येक मनुष्यास आपल्याकडे सर्व सुखसोयी,पैसा,नाव असावे असे वाटते व ते मिळवण्यासाठी तो अप्रत्यक्षपणे आक्रमक बनतो आक्रमकता ही जन्मजात असते. ही एकंदरीत भविष्यकालीन पिढीच्या भवितव्याचा विचार करता त्यावर नियंत्रण कसे ठेवता येईल याचा विचार केला पाहिजे.

**मानसिक स्वास्थ व्याख्या**:- मानसिक आरोग्याचा अभाव उत्पादकता धनात्मक अभिव्रुती

आणि समायोजनाची तयारी या गुणांनी युक्त असे वर्तण म्हणजे मानसिक स्वास्थ होय.

**आक्रमकता व्याख्या**:- दुसऱ्याला इजा करण्याच्या हेतुने घडणारे व्यक्ती व समुहवर्तन म्हणजे आक्रमकता होय. आक्रमकता ही हिंसाच्याराचा एक भाग आहे. हिंसाचाराइतके व्यापक स्वरुप जरी नसले तरी काहीशी संक्षिप्त आणि विशिष्ट स्वरूपाची संकल्पना आहे.

मानसिक स्वास्थ चांगले असेल तर कोणत्याही संकटांना तोंड देता येते ही गोष्ट आजच्या मनुष्य नजरेआड करत आहे. तर मानसिक स्वास्थ उत्तम असेल तर आक्रमकता कमी असते आणि जर मानसिक स्वास्थ बिघडले असेल तर आक्रमकता वाढते. चिडचिड वाढते मग अर्थातच आक्रमकता वाढते व त्याचा परिणाम मानसिक स्वास्थावर होतो

**उद्दिष्टे:**

1) शहरी भागातील व ग्रामीण भागातील विद्यार्थांच्या मानसिक स्वास्थाचा तुलनात्मक अभ्यास करणे .
2) शहरी भागातील व ग्रामीण भागातील विद्यार्थाच्या आक्रमकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**गृहीतके :**

1) शहरी भागातील व ग्रामीण भागातील विद्यार्थांच्या मानसिक स्वास्थाचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येईल ?
2) शहरी भागातील व ग्रामीण भागातील विद्यार्थाच्या आक्रमकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येईल ?

**संशोधनाची साधने:**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील २ प्रमाणित चाचण्यांचा उपयोग केलेला आहे.

१) **आक्रमकता चाचणी**- डाँ. गुरू प्यारी माथुर(रायबरेली) आणि डाँ.राज कुमारी भटनागर (आग्रा) या प्रश्नावलीत एकूण ५० प्रश्न आहेत. या सर्व प्रनांना विद्यार्थ्यांनी पंचबिंदू श्रेणित मत नोंदवायची होती या प्रश्नांमध्ये काही प्रश्न होकारार्थी आणि काही प्रश्न नकारार्थी स्वरूपाचे होती प्रश्न पत्रिकेमध्ये ज्या प्रश्नांना *मार्क केलेले आहे.ते नकारात्मक प्रश्न होती. जे प्रश्न सकारात्मक होती त्यांना ५-४-३-२-१ या प्रमाणे गुणदान केले आणि नकारात्मक प्रश्नांना १-२-३-४-५ या प्रमाणेगुणदान केले.

२) **मानसिक स्वास्थ चाचणी** - डाँ. अरुण कुमार सिंग (पाटना) आणि डां.अल्पना या चाचणी मधे एकूण सहा भाग आहे.

१-मानसिक स्थिरता – यात एकूण १५ प्रश्न आहे.

२- संपुर्ण समायोजन – यात एकूण ४० प्रश्न

३-स्वायता यात १५ प्रश्न

४- स्वसंकल्पना – यातप्रश्न १५ आहेत.

५-बुध्दीत्ता यात ३० प्रश्न आहेत.

असे एकूण १३० प्रश्न या प्रश्नावलीत आहेत या प्रश्नावलीचा प्रतिसाद होय / नाही या दोन भागात होते.

**नमुना निवड** - प्रस्तुत संशोधन जळगाव जिल्ह्यातील या ग्रामीण भागातील माध्यमिक झिप्रु तोताराम महाजन धानोरा जि. जळगाव शाळेतील केले आहे व जळगाव या शहरी भागातील माध्यमिक शाळेत ए.टी.झामरे इथे केले आहे. यादच्छिक पद्धतीतील स्तरिय न्यादर्श पद्धतीने ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील ८० विद्यार्थी आणि शहरी भागातील माधयमिक शाळेतील ८० विद्याथी असे एकूम १६० विद्यार्थी यादचछिक पदधतीने निवडण्यात आलेले आहे.

१) शहरी भागातील व ग्रामीण भागातील विद्यार्थांच्या मानसिक स्वास्थाचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येईल?

**तक्ता क्र.१ माध्यमिक शाळेतील ग्रामिण आणि शहरी विद्यार्थांच्या मानसिक स्वास्थ्याचे मध्यमान,प्रमानविचलन आणि मध्यमानांची तुलना करण्यासाठी ‘t’ मुल्य दर्शवणारे कोष्टक**

| विद्यार्थी | नमुना (N) | मध्यमान (M) | प्रमानविचलन (SD) | मुक्ती प्रमाण संख्या df | ‘t’ प्राप्त मुल्य | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| शहरी | ८० | ६९.९ | १५.१६ | १५८ | ६.४८ | ०.०१ |
| ग्रामीण | ८० | ८७.६७ | १९.२६ | | | |

वरील तक्ता क्र. 01 मध्ये शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्याचे मानसिक स्वास्थाचे मध्यमान, प्रमानविचलन व 't' मुल्य दर्शविले आहे.

शहरी भागातील विद्यार्थ्यांचे मध्यमान ६९.९ प्रमाण विचलन १५.१६ तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मध्यमान ८७.६७ प्रमाण विचलन १९.२६ आले असून यांचे गणनात्मक 't' मुल्य ६.४८ इतके दिसून आले हे 't' मुल्य ०.०१ या पातळीवर सार्थक आहे. म्हणजे शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यात लक्षणीय फरक दिसून आला.

२) शहरी भागातील व ग्रामीण भागातील विद्यार्थांच्या आक्रमकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येईल?

**तक्ता क्र.०२ शहरी भागातील व ग्रामीण भागातील विद्यार्थायांचा आक्रमकतेचे मध्यमान ,प्रमान विचलन आणि मध्यमानाची तुलना करण्यासाठी मुल्य दर्शविणारे कोष्टक:**

| विद्यार्थी | नमुना (N) | मध्यमान (M) | प्रमानविचलन (SD) | मुक्ती प्रमाण संख्या df | ‘t’ प्राप्त मुल्य | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| शहरी | ८० | १८२.४२ | २६.५० | १५८ | १.०४ | सार्थक नाही |
| ग्रामीण | ८० | १७८.३५ | २२.४५ | | | |

वरील तक्ता क्र. ०२ मध्ये शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्याचे आक्रमकतेचे मध्यमान, प्रमानविचलन व 't' मुल्य दर्शविले आहे.

शहरी भागातील विद्यार्थ्याचे मध्यमान १८२.४२ प्रमाण विचलन २६.५० तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्याचे मध्यमान १७८.३५ प्रमाण विचलन २२.४५ आले असून यांचे गणनात्मक 't' मुल्य १.०४ इतके दिसून आले हे 't' मुल्य कोणत्याही पातळीवर सार्थक नाही. म्हणजे शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आक्रमता पातळीत लक्षणीय फरक दिसून नाही.

**निष्कर्ष**:

१) ग्रामीण विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य शहरी विद्यार्थ्यांपेक्षा चांगले आहे.

**२)** शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आक्रमकता मध्यमान गुणांकात सार्थ फरक नाही. म्हणजेच शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आक्रमकता सारखीच असल्याचे दीसून आली.

**संदर्भग्रंथ** :

1. राणे, एस.एस. सामान्य मानसशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन २००२
2. देशपांडे सी.जी.- सामाजिक मानसशास्त्र
3. पंडित र.वी.- शैक्षणिक मानसशास्त्र
4. लवकरे निलाक्षी पांडे शिवरंजनी,जनबंधु दिनेश गोळवीलकर शिला - भाषा व संप्रेषण पांडे,अभिवृती आणि सामाजिक वर्तन.
5. गाडेकर केशव ,पाटील अनिता, इनामदार मुकूंद- प्रगत सामाजिक मानसशासत्र.
6. काळे प्रमला, बालमानसशास्त्र - श्री.विद्या प्रकाशन पुणे.